# देगलूर महाविद्यालयाने यशाची परंपरा राखली

## विज्ञान शाखेचा ९६.९२% तर वाणिज्य शाखेचा ९७.२२% निकाल

देगलूर - येथील देगलूर महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाच्या कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी यंदाच्या वर्ष २०२२ च्या लातूर बोर्ड उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत यश संपादन करून निकाल ९६.९२% लावून यंदाही यशाची परंपरा कायम राखली आहे

देगलूर महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील ४२३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये ७९ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य तर २५९ प्रथमश्रेणी आणि ७१ द्वितीय श्रेणीत उतीर्ण होऊन विज्ञान शाखेचा ९६.९२% निकाल तर कला शाखेत २३१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात १३ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर ९३ प्रथम, १०७ द्वितीय उतीर्ण होऊन ९३.१३% निकाल तसेच वाणिज्य शाखेत १४४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात ३९ विशेष प्राविण्य, ६७ प्रथम, ३४ द्वितीय श्रेणीत उतीर्ण होऊन वाणिज्य शाखेचा ९७.२२% निकाल लागला आहे.

या यशामध्ये महाविद्यालयातील सर्व शाखेच्या शिक्षकांचे प्रयत्न कायम राहिले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. निवृत्ती गोविंदवार, कार्यालयीन अधीक्षक गोविंद जोशी, एस. एन. पाटील, पर्यवेक्षक अ. व्या. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, सचिव शशीकांत चिद्रावार, सूर्यकांतराव नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, देवेंद्र मोतेवार, रविंद्रअप्पा द्याडे, गंगाधरराव जोशी, डॉ. कर्मवीर उन्नग्रतवार, जनार्दन चिद्रावार, चंद्रकांत नारलावार आदी सदस्य, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय गुरुजन आणि आई-वडिलांना दिले आहे.